# कार्यालय नागपूर ,महानगरपालिका नागपूर

## शिक्षण विभाग

शिक्षण विभाग (माध्यमिक)
म.न.पा.केंद्रीय कार्यालय
सिव्हील लाईन्स,नागपूर - 01.

दुरध्वनी क्रमांक 0712-2569933, 2567028
**E-mail Id- education.nmc@gmail.com**

जा.क्र. ५५० दिनांक 1.11.2014

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
म.न.पा. सर्व माध्यमिक शाळा.

विषय:- निर्भय बेटी सुरक्षा समिती अंतर्गत मुलींना मार्शल आर्ट नि:शुल्क आधुनिक प्रशिक्षण व वॉक फॉर सेफ्टी चा कार्यक्रम करण्याबाबत.

देशात दिवसेंदिवस मुलींवर होणाऱ्या अत्याचाराचा आळा घालण्यासाठी निर्भय बेटी सुरक्षा अभियान समिती तर्फे वॉक फॉर सेफ्टी व मार्शल आर्ट चे प्रशिक्षण व प्रदर्शन कार्यक्रम १६ डिसेंबर २०१४ रोजी आयोजित केले आहे. या समिती तर्फे ७ ते १२ व्या वर्गातील व महाविद्यालयातील मुलींना पुढील तीन टप्प्यात प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

१. २४ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१४.

२. १ ते ७ डिसेंबर २०१४.

३. ८ ते १४ डिसेंबर २०१४.

सदर कार्यक्रमाची रूपरेखा ठरविण्याकरिता आपल्या शाळेतील एक शिक्षकाची निवड करून निम्नलिखीत पत्त्यावर आयोजित सभेस पाठवावे.

दिनांक : १५ नोव्हेंबर २०१४

स्थळ : एम.एल.ऐ. होस्टेल सभागृह , सिव्हील लाईन्स , नागपूर.

वेळ : सकाळी १० ते १ वाजता.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

# कार्यालय नागपूर ,महानगरपालिका नागपूर

## शिक्षण विभाग

शिक्षण विभाग (माध्यमिक)
म.न.पा.केंद्रीय कार्यालय
सिव्हील लाईन्स,नागपूर - 01.

दुरध्वनी क्रमांक 0712-2569933, 2567028
**E-mail Id- education.nmc@gmail.com**

जा.क्र. 439 दि.1.11.2014

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
मनपा. --------माध्यमिक शाळा

विषय - माध्यमिक शाळांनी पदनिहाय करावयाच्या खर्चाच्या संबंधाने

विषयाचे अनुषंगाने सुचित करण्यात येते की, या पूर्वी आपणास शाळा स्तरावर करावयाच्या पदनिहाय खर्चाच्या पदनिहाय एकच नस्ती करण्याबाबत सुचना देण्यात आली होती. मात्र आपण प्रत्येकवेळी नविन नस्ती तयार करित असल्याचे निदर्शनास आलेले आहे. यापुढे अश्या नस्ती मंजुरीस्तव सादर करु नये. या बाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) प्रत्येक पदनिहाय एकच नस्ती असावी. वर्ष २०१४-२०१५ मध्ये आपण तयार केलेल्या स्वतंत्र नस्ती पदनिहाय एकत्र करुन एकच नस्ती तयार करावी. कार्यालयात उपलब्ध प्रावधान नोंदीनुसार आपण २०१४-२०१५ मध्ये सादर तयार केलेली नस्ती यांचा ताळमेळ जुळल्यानंतर पुढील खर्चास मंजूरी देण्यात येईल.

२) शाळेतून जावक क्रमांक देऊन नस्ती सादर करावी.

३) शाळेशी संबंधीत व्यक्तीने जसे - मुख्याध्यापक ,शिक्षक,लिपीक , प्रयोगशाळा सहाय्यक, चपराशी यांनी शिक्षण विभागात आवक - जावक विभागात नस्ती सादर करावी.

४) प्रत्येक वेळी खर्च मंजुरीस सादर करतांना मंजुर प्रावधान व झालेला खर्च याची स्पष्ट नोंद असावी.

५) वर्ष २०१४-२०१५ करिता आपल्या शाळेस निश्चित केलेल्या पदनिहाय प्रावधानापेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

६) प्रत्येक खरेदीची नोंद वस्तुनिहाय , साठा नोंदवही मध्ये करुन साठा नोंदवही अद्ययावत करावी.

७) उपरोक्त सूचनांचे पालन केल्याचे तसेच साठा नोंदवहीची मागणी केल्यास सादर केल्यानंतर त्यापूढे खर्चाची नस्ती मंजुर करण्यात येईल.

८) नस्तीतील प्रस्ताव लिपीकाने अथवा मुख्याध्यापकाने स्वतः लिहावा.

९) नस्ती मंजुर झाल्यानंतर लेखा विभागातून नस्ती प्राप्त करण्याची जबाबदारी शाळेची असेल.

१०) शिक्षण विभाग परिपत्रक क्र. १९८७ दिनांक ६.६.२०१४ मध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे नस्ती तयार करावी.

सूचनांचे काटेकोर पालन करावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

प्रतिलिपी ,

१. अपर आयुक्त , म.न.पा. नागपूर यांचे माहितीस्तव सादर.
२. मा. उपायुक्त , म.न.पा. नागपूर यांचे माहितीस्तव सादर.

स्वा/-
शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर